वाचा:-१) नाशिक जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा दिनांक:-० ३/१०/२०१७
२) नाशिक जिल्हा परिषदेने दैनिक महाराष्ट्र टाईम्स मधील जाहिर निवेदन दिनांक :-१८/११/२०१७
३) या कार्यालयाचे पत्र क्रमांक साप्रवि/माहितीसेल/१८३६ ते १८६८ दिनांक :- २१/१२/२०१७
४) मुलाखत दिनांक :- ०६/०१/२०१८
५) कार्यालयीन टिपणी दिनांक 20 /०१/२०१८

नाशिक जिल्हा परिषद नाशिक
जा.क्र.साप्रवि/आस्था-५/माहितीसेल/ 320ते 355 /१८
नाशिक दिनांक 20 /०१/२०१८

## आदेश

नाशिक जिल्हा परिषद वकीलांचे पॅनलवर कायदे सल्लागार म्हणुन नेमणुक होणेकामी निवड समितीने केलेल्या शिफारशी प्रमाणे नाशिक जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा दिनांक :- ०३/१०/२०१७ मधील विषय क्रमांक १२ अन्वये झालेल्या निर्णयानुसार खालील नमुद वकीलांची,उच्च न्यायालय,मुंबई करिता नाशिक जिल्हा परिषदेचे कायदे विषयक सल्लागार म्हणुन या आदेशाच्या दिनांकापासून पुढील तीन वर्षाकरिता पुढील आदेश होईपावेतो तातपुरत्या स्वरुपात खालील अटी व शर्तीवर नियुक्ती करण्यात येत आहे.

| अन | वकीलाचे नाव/दुरध्वनी क्रमांक | न्यायालयाचे नाव |
|---|---|---|
| १ | ॲड.श्री.प्रशांत दहाट<br>दुरध्वनी- ०७१२-२२५३२०४/२२५३२०७ मो.९५४०६३८८७८ | सर्वोच्च न्यायालय |
| २ | ॲड.श्री.विद्याधर गांगुर्डे<br>दुरध्वनी- ०२२-२२६७३६१७/२२६७३०७२ मो.७७३८६३५५५३ | उच्च न्यायालय |
| ३ | ॲड.श्री.प्रसाद भुजबळ<br>मो. ९८९२१३८६६७/९३२५३५६६८२ | उच्च न्यायालय |
| ४ | ॲड.श्रीमती.चैत्राली देशमुख<br>दुरध्वनी ०२२-२२८८३११२ मो-९७६६३६३४२७ | उच्च न्यायालय |

**कायदा सल्लागार यांनी पार पाडावयाची दाव्याबाबतच्या अटी व शर्ती**

१.फी चे दर

| | न्यायालयाचा प्रकार | रक्कम रुपये |
|---|---|---|
| **वकिल फी प्रती केस सर्व खर्च मिळुन** | अ) सर्वोच्च न्यायालय (अ स्तर) | रु ४०,०००/- |
| | ब) उच्च न्यायालय मुंबई ,उच्च न्यायालय औरंगबाद खंड पीठ ,महाराष्ट्र प्रशासकिय न्यायधिकरण (ब स्तर) | रु १०,०००/- |
| **लेखी-कायदेविषयक सल्ला/मत** | १) अ स्तर | रु २,५००/- |
| | २) ब स्तर | रु १,२५०/- |
| **जिल्हा परिषदेच्या वतीने कॅव्हेट दाखल करणे** | १) अ स्तर | रु २०,०००/- |
| | २) ब स्तर | रु ५,०००/- |

२.खातेप्रमुखाकडुन जर एखाद्या प्रकरणी कायदेशीर सल्ला विचारला तर त्याकरिता वेगळी फी आकारता येणार नाही.

३.ज्या खात्याची केस असेल त्या खात्याकडे आगाऊ स्टॅम्प रिसिट देऊन फी मागणी करावी लागेल.फि बाबतची स्वतंत्र

मागणी संबधित विभाग प्रमुख यांचे कडेस करावी.व ज्या-त्या विभागाच्या दाव्या बाबत संबधित खाते प्रमुख यांचेशी समक्ष संपर्क ठेवावा.

४.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,नाशिक यांचे नियंत्रणाखाली व त्यांच्या आदेशाप्रमाणे कोर्टकेस विषयक सर्व कामे पार पाडणे. आवश्यकता भासल्यास दाव्या बाबत चर्चेसाठी जि.प.नाशिक येथे येणे बंधनकारक राहील. तसेच आवश्यकते नुसार ईतर न्यायालयाचे कामकाज करणेही बंधनकारक राहील.

५.जिल्हा परिषदेच्या चौकशी प्रकरणी ( जिल्हा परिषदेमार्फत घेतलेल्या कामाची कराराची छाननी करणे व सल्ला देणे) ज्या प्रकरणी कायदेशिर आवश्यकता असेल तेथे कायदेशिर सल्ला देणे.

६.जिल्हा परिषदेच्या वतीने न्यायालयात (सिव्हिल, क्रिमिनल कामगार इ.कोर्ट प्रकरणे ) खालील परंतुकान्वये चालविणे ( सध्या न्यायालयात चालु असलेली प्रकरणे भविष्यात दाखल होणारी प्रकरणे ) परंतु एखाद्या न्यायालयीन प्रकरणी

अन्य वकीलांची नियुक्ती करण्याचा हक्क जिल्हा परिषदेकडे राहिल व तो हक्क राखुन ठेवण्यात आला आहे.

७.जिल्हा परिषद व पंचायत समिती /ग्रामपंचायत अंतर्गत जि.प.शी संलग्न कार्यालयासंबंधी न्यायालयीन प्रकरणी जिल्हा परिषदेविरुध्द न्यायालयात आपणास वकीली करता येणार नाही.या व्यतिरिक्त आपणास खाजगी वकिली करता येईल.

८.जिल्हा परिषदेमार्फत देणेत आलेल्या केसेसचा आढावा दरमहा लेखी स्वरुपात देणे बंधनकारक राहिल व जिल्हा परिषदेशी वेळोवेळी संपर्कात राहणे आवश्यक आहे.

९.जिल्हा परिषदेच्या ज्या विभागाची केस आहे त्या विभागाचे खाते प्रमुख /कार्यालयीन अधिक्षक / कक्ष अधिकारी यांचेशी भ्रमणध्वनी /दुरध्वनी /ईमेल व्दारे समक्ष संपर्क संबधित वकीलांनी ठेवावा.सदर दाव्याबाबत पुर्वसुचना संबधितांना दयाव्यात.

१०.दाव्याच्या तारखेबाबत वकीलांनी ज्या विभागाचा दावा आहे,त्या विभागास वेळोवेळी कळवावे.तसेच त्या खाते प्रमुख यांचेशी समन्वय साधुन व दाव्या बाबत संबधित कार्यालयाकडुन आवश्यक असणारे कागद/पत्रे समक्ष प्राप्त करवुन घ्यावेत.

११.काही दाव्याच्या बाबतीत इंग्रजी मध्ये पत्र व्यवहार असतो त्याचे मराठी भाषेत रुपांतर करुन देणेची जबाबदारी संबधित वकीलांची राहील.तसेच शासन निर्णय /परिपत्रके मराठीतुन असल्याने इंग्रजी भाषेमध्ये रुपांतरीत करण्याची जबाबदारी संबधीत वकीलांची राहील.

१२.जिल्हा परिषदेच्या पॅनल वरील वकीलांनी ऐकमेकात समन्वय ठेवावा.एखादया तारखेस काही कारणास्तव न्यायालयात उपस्थित राहणे शक्य नसल्यास पॅनलवरील वकील यांनी त्याऐवजी पर्यायी वकीलांची व्यवस्था परस्पर करावी.

वरील अटी व शर्ती यांचा भंग झाल्यास वकील पॅनल वरुन संबधित वकीलांना कमी करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी राखुन ठेवले आहे.

(दीपक कुमार मीना)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद नाशिक

प्रति,

-------------------------------------------------------

-------------------------------------------------------

प्रत माहितीसाठी व कार्यवाहीसाठी

१.खातेप्रमुख सर्व जिल्हा परिषद नाशिक
२.गट विकास अधिकारी पंचायत समिती सर्व
३.गट शिक्षण अधिकारी पंचायत समिती सर्व
४.बाल विकास प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बाल विकास सेवा प्रकल्प योजना सर्व
५.उपअभियंता ( इवद/लपा/ग्रापापु) जिल्हा परिषद उपविभाग सर्व
६.तालुका आरोग्य अधिकारी पंचायत समिती सर्व